# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**

## कृषि विज्ञान संकुल येथे जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रम संपन्न झाला

कृषि विज्ञान संकुल, मालेगाव अंतर्गत कृषि, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्रद्यान महाविद्यालये व कृषि तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रम ५ जून २०२३ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दादाजी भुसे साहेब मंत्री, बंदरे व खनिजकर्म महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नाशिक जिल्हा यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे यांची उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमासाठी उप विभागीय कृषि अधिकारी मा. श्री. गोकुळ अहिरे, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयचे प्राचार्य श्री. कुदळे, कृषि विज्ञान संकुलाचे सहाय्यक कुलसचिव रविंद्र खैरनार हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून मा. श्री. दादाजी भुसे साहेब यांनी कृषि विज्ञान संकुलातील सर्व महाविद्यालयांना भेट दिली तसेच जैविक खते प्रयोगशाळा, अभ्यासिका, स्टाफ रूम आणि महाविद्यालयीन परिसराची पाहणी केली. जागतिक पर्यावरण दिन निमित्त महाविद्यालयीन परिसरामध्ये मा. श्री. भुसे साहेबांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांशी परिसंवाद केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच महाविद्यालयीन परिसरामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपहारगृह, स्पर्धात्मक परीक्षांसाठी अभ्यासिका लवकरात लवकर चालू करण्यात येईल असे आश्वासन दिले. पर्यावरणाचे संतुलन कसे राखावे यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी पर्यावरण दिन निमित्त प्लॅस्टिक मुक्त शहर कसे करता येईल यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृषि विज्ञान संकुलामध्ये घडत असलेल्या प्रगतीचा अहवाल सादर करत पुढे येणाऱ्या आव्हाणांच्या काही मागण्या मंत्री महोदयांसमोर मांडल्या.

जागतिक पर्यावरण दिन निमित्त विद्यार्थी प्रतिनिधि म्हणून औदुंबर कुलकर्णी व किरण पाटील या विद्यार्थ्यानी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी, सर्व विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी मिळून कृषि विज्ञान संकुलातील परिसर प्लॅस्टिक मुक्त करून स्वच्छ करून वृक्षारोपण केले. आजच्या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उदय पवार यांनी केले.



# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# कृषी विज्ञान संकुल, काष्टी

**KVS NEWS**





मालेगाव : कृषी विज्ञान संकुलात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना दादा भुसे.

## कृषी विज्ञान संकुलात पर्यावरण दिन उत्साहात

मालेगाव, ता. ७ : काष्टी (ता. मालेगाव) येथील कृषी विज्ञान संकुलात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री दादा भुसे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे होते. कार्यक्रमाला विभागीय कृषी अधिकारी गोकुळ अहिरे, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. कुदळे, कृषी विज्ञान संकुलाचे सहाय्यक कुलसचिव रवींद्र खैरनार उपस्थित होते. श्री. भुसे यांनी कृषी विज्ञान संकुलातील सर्व महाविद्यालयांना भेट दिली. यावेळी महाविद्यालयीन परिसरात पालकमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

श्री. भुसे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध प्रश्नांवर चर्चा केली. महाविद्यालयीन परिसरामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपाहारगृह, स्पर्धात्मक परीक्षांसाठी अभ्यासिका लवकरच सुरु करण्यात येईल असे आश्वासन दिले. पर्यावरणाचे संतुलन कसे राखावे यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. सोनवणे यांनी पर्यावरण दिनानिमित्त प्लॅस्टिक मुक्त शहर कसे करता येईल याविषयी माहिती सांगितली. तसेच कृषी विज्ञान संकुलातील प्रगतीचा अहवाल सांगत अडचणी मांडल्या. औदुंबर कुलकर्णी व किरण पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी, सर्व विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी मिळून कृषी विज्ञान संकुलातील परिसर प्लॅस्टिक मुक्त करून स्वच्छ करून वृक्षारोपण केले. डॉ. उदय पवार यांनी सूत्रसंचालन केले.